# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार

**रामाआ - तक्रार क्र. बीएम ३४६/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जितेंद्र रामबडाई गुप्ता**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का)**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरिवली-१ यांचे कार्यालय,
तळमजला, रुस्तमजी कॉम्पलेक्स, महानगरपालिका मंडई हॉल,
जे.एस.मार्ग, दहिसर (पश्चिम) मुंबई -४०० ०६८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का)**
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरिवली-१ यांचे कार्यालय,
तळमजला, रुस्तमजी कॉम्पलेक्स, महानगरपालिका मंडई हॉल,
जे.एस.मार्ग, दहिसर (पश्चिम) मुंबई -४०० ०६८

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१०.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४९३६ प्रकरणी आयोगाने दि.२८.०१.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. १८.०२.२०१९ पर्यंत या प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती, अपिलार्थींना विनामुल्य द्यावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्तो यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ०७.०३.२०१८ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का) बोरीवली- १, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरीवली यांचे कार्यालय, दहिसर (प), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १८.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का) बोरीवली यांनी त्यांचा अहवाल दि. ०५.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थींना दि. १८.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये नस्तीची पडताळणी करुन आवश्यक माहिती सांगितल्यास छायांकित प्रती काढणेसाठी लेखाशाखेकडे निधीची मागणी करता येईल व निधी उपलब्ध होताच माहिती देता येईल असे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते. तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी देखील दि. १८.०२.२०१९ चे पत्राचे अनुषंगाने आपणास अपेक्षित माहितीसाठी रक्कम रुपये ५९९०/- एवढा खर्च होत असून लेखा शाखेला निधीची मागणी करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्याकडे निधी उपलब्ध नसल्याने तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच, जन माहिती अधिकारी संबंधीत नस्ती आता कोणत्या कार्यालयाकडे आहे याबाबत काहीही सांगु शकले नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास निवेदन केले की, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेशानंतर कोषागारातून निधी उपलब्ध होण्यास विलंब होत असल्याने अपिलार्थींनी छायांकित प्रती काढण्यासाठी होणारा खर्च करणेस तयारी दर्शवली व स्वत: खर्च करुन दि. २०.१०.२०१८ रोजी माहिती प्राप्त करुन घेतली.

जन माहिती अधिकारी यांनी सदर नस्ती आता कोणत्या कार्यालयाकडे आहे याबाबतचे लेखी निवेदन, तसेच दि. २८.०१.२०१९ ते आजपर्यंत जन माहिती अधिकारी कोण होते यांची यादीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. अपिलार्थींनी स्पष्ट करावे की, त्यांनी दि. २०.१०.२०१८ रोजी प्राप्त करुन घेतलेली माहिती व्यतिरिक्त आता कोणती माहिती त्यांना अपेक्षित आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.१०.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : ०४.१०.२०२४**

4-10-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३४६/२०१९
## तक्रारकर्ता श्री. जितेंद्र रा. गुप्ता
## सुनावणी दिनांक : २३.१०.२०२४ (In continuation of order dt ०४.१०.२०२४)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित ---"---- |

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २०.१०.२०२४ चे लेखी निवेदनद्वारे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने ते दिनांक २३.१०.२०२४ च्या सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाहीत, असे सादर करुन पुढील तारीख मतमोजणीनंतर ठेवण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

### आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २८.१०.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**